ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें. —
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 58.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ६ जुलै, १९५५ | अंक २७

## विविध माहिती

**सांठविलेला तांदूळ निकामी**—त्रावणकोर-कोचीन राज्यांत धान्यावरील नियंत्रणें दूर करण्यांत आलीं, त्यावेळीं तांदुळाच्या किंमती वाढूं नयेत म्हणून राज्य-सरकारनें ९,९०० टन तांदुळाचा सांठा करून ठेवला होता. त्यापैकी ७,००० टन तांदूळ खाण्यास अयोग्य झाल्यामुळें वाया गेला. त्यामुळें सरकारला सुमारें १२ लाख रुपयांचें नुकसान सोसावें लागलें.

**आंध्र सरकार कर्ज उभारणार**—आंध्र-सरकारनें राज्यांतील भांडवली खर्च भागविण्यासाठी ऑगस्ट महिन्यांत कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे कर्जाची एकूण रक्कम ५ ते १० कोटींपर्यंत असेल. त्याशिवाय नंदीकोंडा योजना व तुंगभद्रेवरील कालवे हीं कामें करण्यासाठी भारतीय सरकारकडे ३७ कोटी रुपयांचें कर्ज मागण्याचेंहि राज्य सरकारनें ठरविलें आहे.

**विकास कार्यासाठी तरुणांचीं शिबिरें**—येत्या दिवाळीच्या सुट्टींत गुजरातमधील १०,००० तरुणांना स्थानिक विकास कार्यांत गोवून घेण्याचा विचार सरकारतर्फे चालू आहे. तरुणांत ८० टक्के लोक विद्यार्थी असतील. भारतीय सरकारच्या शिक्षण खात्यानें अशा प्रकारचीं शिबिरें उघडण्यासाठी ३७,५०,००० रुपयांची तरतूद केली आहे.

**जुनागडला पाण्याचा पुरवठा**—जुनागढ शहराला पाण्याचा पुरवठा करण्यासाठी शहरापासून ६ मैलांवर एक तलाव बांधण्यांत येणार आहे. तलाव बांधण्यासाठी सुमारें ४७,६५,००० रुपये खर्च येईल. मूळ योजना पाटबंधाऱ्याची होती. पण शहराच्या आसपासच्या खेडुतांनीं तिचें रूपांतर करण्यास संमति दिल्यानें तलाव बांधणें शक्य झालें.

**दुर्मिळ पोस्टाच्या तिकिटाची किंमत**—लंडनमधील एका लिलांवांत तिकिटें जमविणाऱ्या एका ऑस्ट्रेलिअन संग्राहकानें अमेरिकेच्या १ सेंटच्या तिकिटासाठी १,५०० पौंड दिले. हें तिकिट मॅसेच्युसेट्‌च्या मिलिटरी पोस्ट-मास्तरनें १८४६ सालीं काढलेलें असून त्यावर बहुधा जॉर्ज वॉशिंग्टनचें चित्र आहे. ह्यानंतर पुढील वर्षींच अमेरिकेंत पोस्टाचीं तिकिटें काढण्यांत आलीं.

**पदव्यांची जादू संपली**—सरकारतर्फे देण्यांत येणाऱ्या पदव्यांमध्यें आतां लोकांच्या मनावर पकड घेण्याचें सामर्थ्य राहिलेलें नाहीं, असा अभिप्राय ब्रिटनमधील एका सार्वजनिक कार्यकर्त्यानें व्यक्त केला आहे. युद्धापूर्वी एखाद्या कामासाठीं फंड जमविण्यास पदवीविभूषित मोठ्या लोकांचा उपयोग होत असे. आतां मात्र चित्रपटांतील नट, रेडिओ-कलाकार अगर टेलिव्हिजनमध्यें दिसणारे कलाकार ह्यांचाच उपयोग अधिक होतो, असें त्यानें सांगितलें.

**कॉलिंपाँग येथील प्रवाशांची सोय**—कॉलिंपाँग हे भारतामधील एक उत्कृष्ट हवेचें ठिकाण आहे. ह्या ठिकाणीं रहाण्याचा लाभ घेण्यासाठी दरवर्षी शेंकडों प्रवासी येतात. प्रवाशांची अधिक चांगली सोय करण्यासाठी भारतीय सरकारनें ह्या ठिकाणीं एक कचेरी उघडली आहे. भारतीय प्रवाशाप्रमाणेंच परदेशांतून येणाऱ्या प्रवाशांनाहि साह्य करण्यांत येईल.

**अणुशास्त्रज्ञांना रोख रकमा**—अमेरिकेच्या ॲटॉमिक एनर्जी कमिशननें ४ अणुशास्त्रज्ञांना मिळून ४,००,००० डॉलर्स दिले आहेत. ह्या शास्त्रज्ञांनीं 'प्ल्यूटोनिअम' हे स्फोटक द्रव्य वेगळें काढण्याची पद्धति शोधून काढली होती. ह्या रकमेच्या बदला त्यांनीं आपले हक्क अमेरिकन सरकारला दिले आहेत.

**दम्यावर औषधी मासे**—काथगुडेम ह्या ठिकाणीं हकीम अबदुलसाहेब ह्या नांवाचे एक हकीम रहातात. हे हकीम एका विवक्षित दिवशीं एखाद्या तळ्यांत कांहीं औषधी टाकतात. तळ्यांतील माशांच्या पोटांत औषध गेल्यावर ते दम्यावर गुणकारी ठरतात असें म्हणतात. सुमारें १,५०० दमेकऱ्यांनीं कांहीं दिवसापूर्वी ह्या औषधी माशांचें सेवन केलें आहे.

**कोपरगांव येथील साखरेचा कारखाना**—मुंबई सरकारनें कोपरगांव को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीचे आणखी ३ लाख रुपयांचे भाग विकत घेतले आहेत, असें समजतें. आतां सरकारनें घेतलेल्या भाग-भांडवलाची रक्कम १० लाख रुपये झाली आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री उभारण्याचें काम चालू असून, चालू सालच्या नोव्हेंबरमध्यें तो सुरू होईल.

**जबलपूर येथें भिक्षेकऱ्यांसाठी आसरा**—मध्यप्रदेश सरकारनें जबलपूर येथें भिकाऱ्यांना आसरा देण्यासाठी विश्रांतिस्थान बांधण्याचें ठरविलें आहे. इमारतीसाठी सरकारनें ५०,००० रुपये मंजूर केले असून जबलपूरचें कॉर्पोरेशन ३५,००० रुपये देणार आहे.

**कुंभकोणम् येथील इस्पितळ**—कुंभकोणम् येथील सरकारी इस्पितळांतील खाटांच्या संख्येंत वाढ करण्याची योजना आंखण्यांत आली आहे. क्षयरोगी व गुप्तरोगानें पछाडलेल्या स्त्रियांसाठीं आणखी दहा खाटांची सोय करण्यांत येणार आहे. त्याशिवाय शस्त्रक्रियेच्या गृहाचाहि विस्तार करण्यांत येईल.

**आंतरराष्ट्रीय घटनांचा अभ्यास**—इंडिअन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स ह्या संस्थेनें आंतरराष्ट्रीय घटनांचा अभ्यास करणारांच्यासाठी एक शाळा काढण्याचें ठरविलें आहे. शाळा दिल्ली विद्यापीठाला जोडण्यांत येईल आणि तीन वर्षांच्या अभ्यासक्रमानंतर यशस्वी विद्यार्थ्यांना दिल्ली विद्यापीठातर्फे पीएच. डी. ची पदवी देण्यांत येईल.

**सुरत म्युनिसिपालिटीची करवाढ**—सुरत म्युसिसिपल बोर्डानें मालमत्तेवरील करांत २० टक्के व पाणी पट्टींत ४० टक्के वाढ करण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय ज्या घरांत मुतारीची सोय नसेल त्याच्या मालकाकडून ५ रुपये सॅनिटरी फी घेण्यांत येणार आहे. कर वाढीला मुंबई सरकारची संमति घ्यावी लागेल, आणि तीमुळें उत्पन्नांत ३,८०,००० रुपयांची भर पडेल.

**लखनौ येथें अणु-संशोधन संस्था**—भारतीय सरकारनें देशांत पांच ठिकाणीं अणु-संशोधन संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकी एक संस्था लखनौ येथें सुरू करण्यांत येणार आहे. संशोधनाचा वैद्यकीय विभाग सेंट्रल ड्रग रिसर्च इन्स्टिटयूटचे डायरेक्टर डॉ. मुखर्जी यांच्याकडे राहील. सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ डॉ. कु. जानकी अम्मल ह्या त्यांना साह्य करणार आहेत.

**दिल्ली-कलकत्ता नवीन गाडी**—ता. २ ऑक्टोबरपासून दिल्ली ते कलकत्ता ह्या शहरांच्या दरम्यान उतारूंसाठीं नवीन गाडी सुरू करण्यांत येणार आहे. गाडींतील एका डब्यांतून दुसऱ्या डब्यांत जाण्यासाठी 'कॉरिडॉर' ठेवण्यांत येणार आहे. गाडीचे सर्व डबे तिसऱ्या वर्गाचे असतील. २ ऑक्टोबर हा महात्मा गांधींचा जन्मदिन आहे.

**अहमदाबाद कॉर्पोरेशनचें कर्ज**—चालू आर्थिक वर्षांत अहमदाबाद कॉर्पोरेशनला दोन कर्जें उभारण्याची परवानगी मुंबई सरकारनें दिली आहे. दोन्ही कर्जांची मिळून रक्कम ४८,६५,००० रुपये होईल. एक कर्ज शहरासाठी पाणीपुरवठा व ड्रेनेजची व्यवस्था करण्यासाठी उभारण्यांत येत असून दुसरे साबरमती नदीवरील पुलासाठी आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

"निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु" म्हणजेच

## ★ हातीं घ्याल तें तडीस न्याल ★

—शिक्षणप्रसारक मंडळी, पुणें.

एक हजार टनांची नवीन मशिनरी, वार्षिक एक लक्ष पोत्यांपेक्षा जास्त पोतीं साखरेचें उत्पादन व भागीदारांना कायमचा

## १० टक्के नफा

हें कार्य तडीस गेलें. आतां पुढील हंगामांत

**स्पिरिट उत्पादनाचें कार्य तडीस जाईल**

ठेवी परत करण्याचें कार्य चालूं आहे.

| वर्ष | ठेवीची रक्कम |
|---|---|
| ३०-९-१९५१ अखेर | रु. १,०१,९९,१५० |
| ३०-९-१९५१ अखेर | रु. ९६,११,३०० |
| ३०-९-१९५३ अखेर | रु. ७३,१५,४०१ |
| ३०-९-१९५४ अखेर | रु. ५७,५९,१९१ |
| २५-६-१९५५ अखेर | रु. ४१,९१,३६६ |

ता. २६ जून १९५५ च्या वार्षिक सभेंत भागीदारांनीं संचालकांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक मंजूर करून

**प्रेफरन्स शेअरवर ५ टक्के** व **ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के**

**नफा देण्याचा ठराव मंजूर केला.**

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. २६ जून १९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंटस्.

अर्थ
बुधवार, ता. ६ जुलै, १९५५



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## बँकिंग कंपन्यांना व्यवहार चालविण्याचा लायसेन्स

### रिझर्व्ह बँकेच्या धोरणाचें स्पष्टीकरण

१९५४ मध्यें बँकिंगविषयक नवे कायदे कोणतेच झाले नाहींत,पण जुन्या कायद्यांस अनुसरून कांहीं पद्धतींत मात्र दुरुस्त्या करण्यांत आल्या. बँकिंग कंपन्यांची वरचेवर पद्धतशीर तपासणी करण्याचें धोरण रिझर्व्ह बँकेनें स्वीकारलेलें आहे, त्यास अनुसरून १९५४ मध्यें बऱ्याच बँकांची तपासणी करण्यांत आली. बहुतेक सर्व बँकांची आतां एकदां तरी तपासणी पुरी झाली आहे व कांहींच्या तपासणीची दुसरी फेरी सुरू आहे. १९५४ मध्यें २२७ बँका तपासण्यांत आल्या, त्यांपैकी २६ शेडयूल्ड बँका होत्या. बँकांच्या तपासणीचा उद्देश खालील तक्त्यांत दिला आहे.

**बँकांची तपासणी**

| उद्देश | शेडयूल्ड बँका | | बिगर शेडयूल्ड बँका | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९५४ | १९५३ | १९५४ | १९५३ | १९५४ | १९५३ |
| लायसेन्ससाठी ... | — | ३ | ११५ | ८४ | ११५ | ८७ |
| सर्वसाधारण कारणांसाठी तपासणी ... | २५ | ११ | ७२ | ४७ | ९७ | ५८ |
| बँकांच्या संमतीनें ... | १ | — | ४ | — | ५ | — |
| 'स्कीम ऑफ अरेंजमेंट'च्या मंजुरीसाठी .. | — | — | — | — | — | — |
| दुसऱ्या शेडयूल्डमध्यें घालण्यासाठी ... | — | — | २ | २ | २ | २ |
| परिस्थितीचा कोर्टाला अहवाल देण्यासाठी ... | — | — | ४ | ५ | ४ | ५ |
| देणें देण्यास असमर्थ असल्याचें सर्टिफिकेट... | — | — | १ | १ | १ | १ |
| लिक्विडेशनमधील बँकांचा कोर्टाला व मध्यवर्ती सरकारला अहवाल ... | — | — | २ | — | २ | — |
| एकूण | २६ | १४ | २०१ | १४० | २२७ | १५४ |

बँकिंगचा धंदा चालविण्याची पात्रता अजमावण्यासाठीच एकूण तपासण्यांपैकी निम्म्यांपेक्षा अधिक तपासण्या झाल्या, असें वरील तक्त्यावरून दिसून येईल. सर्वसाधारण कारणांसाठी तपासणी ( बँकिंग कंपन्यांचा कायदा, ३५ वें कलम ) ९७ बँकांची झाली. ती कायद्याच्या २२ व्या कलमाखालील लायसेन्स-साठी होती. राज्य-सरकारांच्या मालकीच्या व नियंत्रणाखालील पांच बँकांना बँकिंग कंपन्यांचा कायदा लागू नव्हता, तरी त्यांच्या संमतीनें त्यांची तपासणी करण्यांत आली.

शेडयूल्ड बँकांच्या सर्व तपासण्या व ७२ बिगर-शेडयूल्ड बँकांच्या तपासण्या ह्या फेरतपासण्या होत्या, म्हणजे त्यांची एक तपासणी होऊन गेलेली होती. ह्या तपासण्यांमुळें रिझर्व्ह बँकेला सर्व बँकांच्या व्यवहार-पद्धतीवर चांगली देखरेख ठेवतां येणें शक्य झालें आहे. बँकिंग चांगल्या पायावर स्थिरावण्यास त्यांचा उपयोग झाला आहे. तपासणीच्या वेळीं दिसलेले दोष सुधारले जावे व त्या सुधारणेची प्रगति रिझर्व्ह बँकेच्या लक्षांत यावी, ह्या दृष्टीनें ८२ बँकांकडून मासिक व ३२३ बँकांकडून त्रैमासिक तक्ते मागविण्यांत येत होते. ज्या बँकांकडून अपेक्षित सुधारणा झाली नाहीं, त्यांना प्रयत्नांची कोशीस करण्याचा सल्ला देण्यांत आला.

### कारभार सुधारण्यास भरपूर वाव

१९५४ अखेर, ३४ बँकांना लायसेन्स दिलेले आहेत. १ शेडयूल्ड बँक व १० बिगर-शेडयूल्ड बँका ह्यांना लायसेन्स नाकारण्यांत आला; त्यांचा व्यवहार ठेवीदारांच्या हितास बाधक असल्याचें आढळून आलें होतें. अशा रीतीनें आतांपर्यंत एकूण १६ बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला आहे.

४९० बँकांचे लायसेन्ससाठी अर्ज अद्याप विचारांत आहेत. बँकिंग कंपन्यांचा कायदा सुरू झाला, त्यावेळीं चालू असलेल्या बँकांना रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स देईपर्यंत कारभार चालू ठेवण्यास कायद्याची कोणतीहि अडचण नाहीं. म्हणून, लायसेन्स देण्यास विलंब लागल्यानें कोणत्याहि बँकेस अडचण वाटण्याचें कारण नाहीं. कायद्यांतील तरतुदींमुळें, १६ मार्च १९५२ पर्यंत कोणत्याच बँकेस लायसेन्स नाकारणें रिझर्व्ह बँकेला शक्य नव्हतें. किमान भांडवलाची अट पुरी पाडण्यासाठी ६२ बँकांना मुदती वाढवून दिल्या, त्या संपेपर्यंत त्यांना लायसेन्स नाकारतां येऊं शकला नाहीं. त्यांपैकी कांहीं बँका व 'ब' राज्यांत स्थापन झालेल्या व फक्त त्या राज्यांतच व्यवहार करणाऱ्या बँकांना ११ व्या कलमाच्या अंमलबजावणीची ३१ मार्च, १९५५ पर्यंत मॉफी मिळालेली आहे; तेव्हां त्यांना लायसेन्स नाकारणें गैर झालें असतें. रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स देणें, ह्याचा अर्थ बँकेची तपासणी होऊन तिच्या सुदृढपणाबद्दल रिझर्व्ह बँकेची खात्री झालेली आहे, असा होतो आणि ठेवीदारांच्या मतें, लायसेन्स धारण करणारी बँक विश्वासार्ह समजली जाईल. म्हणून कांहीं बँकांचे व्यवहार देखरेखीखाली ठेवण्यांत आले आहेत व कांहींवर नियंत्रणें घालण्यांत आलीं आहेत. कांहीं बँकांवर, रिझर्व्ह बँकेच्या संमतीनें बँकिंग सल्लागार नेमण्यांत आले आहेत तर कांहीं बँकांच्या बोर्डाच्या सभांस रिझर्व्ह बँकेचे अधिकारी उपस्थित होतात व त्यांचें कारभारावर नजर ठेवतात. आवश्यक त्या पातळीइतपत ज्यांचा कारभार नाहीं, अशांना पातळी वाढविण्यास संधि देणें आवश्यक आहे; लायसेन्ससाठी आलेल्या अर्जांची विल्हेवाट लावून टाकण्यासाठी अशा बँकांना घाईनें लायसेन्स नाकारणें इष्ट नाहीं.

अपुरे रिझर्व्ह, अपुरे तरते पैसे, आवाक्याबाहेर कर्जें, मालमत्तेच्या तारणावर प्रमाणाबाहेरील कर्ज, बुडीत व संशयित कर्जें ह्यांचें मोठें प्रमाण, इत्यादि प्रमुख दोष तपासणींत दिसून आले. त्या सर्वांचे बाबतींत सुधारणा होत आहे. हिंदी बँकांना व्यवहाराची वहिवाट परिचयाची झालेली नव्हती आणि

१९४२–४७ ह्या काळांत पैसा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्यानें कित्येक अननुभवी लोकांनीं भराभर बँका काढल्या. बहुतेक बँकांनीं रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यास अनुसरून, संशयित कर्जांच्या वसुलीची शिकस्त चालविली आहे. कोर्टांच्या दिरंगाई-मुळें कांहीं बाबतींत वसुलीस विलंब होणें अपरिहार्य आहे. ह्या सर्व गोष्टींवरून लक्षांत येईल, कीं लायसेन्स देण्याचे बाबतींत रिझर्व्ह बँक घाई करीत नाहीं. त्याचें कारण तिला ठेवीदारांचें हित काळजीपूर्वक पहावयाचें आहे व शक्य तितक्या बँकांना लायसेन्स मिळविण्यास पात्र करावयाचें आहे.

---

## मुंबई राज्यांतील हातमागाचा आणि यंत्रमागाचा धंदा

मुंबई सरकारच्या ब्यूरो ऑफ इकॉनॉमिक्स अँण्ड स्टॅटिस्टिक्स-तर्फे विणकाम, कातडीं कमावणें, चामड्याचें काम आणि लोहारकाम या घरगुती उद्योगधंद्यांची आर्थिक व सामाजिक पाहणी करण्यांत येत असून एप्रिल ते ऑक्टोबर १९५३ पर्यंत विणकामधंद्याची खानेसुमारी पुरी करण्यांत आली आहे. खानेसुमारीचें काम करणाऱ्या ब्यूरोच्या नोकरवर्गाला याबाबतचें ट्रेनिंग देण्यांत आलें असून त्यानें ४६३ केंद्रांत हें काम केलें, तर महसूल खात्याच्या नोकरवर्गानें वरील नोकरवर्गाच्या देखरेखीखाली छोट्या गांवांतील खानेसुमारीचें काम केलें. खानेसुमारीचे वेळीं जे माग आणि कारखाने बंद होते व जे सुरू होण्याची शक्यता नव्हती त्यांची खानेसुमारी करण्यांत आलेली नाहीं. बृहन्मुंबई आणि सोलापूर येथील याबाबतचे आंकडे हे प्राथमिक स्वरूपाचे असून त्यांत नंतर सुधारणा करण्यांत येईल.

### कामधंद्याचें स्वरूप

या आंकडेवारीचें पृथक्करण केलें असतां पुढील माहिती मिळते.

(१) हातमाग आणि यंत्रमागाच्या धंद्यांत एकूण २,४५,९२२ लोकांना अथवा फॅक्टरीज कायद्याखाली मुंबई राज्यांत नोंद-विलेल्या सुती, रेशमी अथवा लोकरीच्या कापड-गिरण्यांत १९५२ सालीं जेवढ्या लोकांना कामधंदा मिळाला होता त्याच्या ५६ टक्के लोकांना या धंद्यांत कामधंदा मिळाला होता.

(२) १६,५०४ लोकांना, म्हणजे या धंद्यांतील सात टक्के लोकांना अंशतः अथवा पूर्णपणें विजेवर चालणाऱ्या कारखान्यांत कामधंदा मिळाला आहे.

(३) यंत्रशक्ति असलेल्या कारखान्यांतील सुमारें ८५ टक्के कामगार स्वतःचे माग असलेल्या कुटुंबांतील आहेत. यांपैकीं सुमारें ५३ टक्के पुरुष व सुमारें ४७ टक्के स्त्रिया आहेत. या प्रकारच्या कामगारांपैकीं जवळजवळ ९९ टक्के कामगार घरगुती म्हणजे ज्या कारखान्याचें भांडवल ६ हजार रुपयांपेक्षा अधिक नाहीं व ज्यांत ९ कामगारांपेक्षा अधिक कामगार नाहींत अशा कारखान्यांत काम करतात. बाहेरच्या कामगारांपैकीं सुमारें ६० टक्के पुरुष व ४० टक्के स्त्रिया आहेत.

(४) यंत्रशक्ति नसलेल्या कारखान्यांपैकी लहान प्रमाणांत चालणाऱ्या (म्हणजे ६,००० हून अधिक परंतु ३०,००० रुपयांहून कमी भांडवलाच्या आणि जास्तींत जास्त ५० कामगार असलेल्या) कारखान्यांत या प्रकारच्या कारखान्यांतील एकूण कामगारांच्या १ टक्का इतके कामगार आहेत. याचाच अर्थ असा कीं, हातमाग धंद्यांत घरगुती धंद्यांचें प्रमाण जास्त आहे.

(५) अंशतः अथवा पूर्णपणें यंत्रशक्तीवर चालणाऱ्या कारखान्यांत ५७ टक्के कामगार कुटुंबीय मंडळींपैकीं आहेत आणि उरलेले ४३ टक्के बाहेरचे आहेत. कुटुंबांतील कामगारांपैकीं सुमारें ५४ टक्के पुरुष व ४६ टक्के स्त्रिया आहेत. कुटुंबाबाहेरील कामगारांत स्त्री–पुरुष कामगारांचें प्रमाण अनुक्रमें १९ आणि ८१ टक्के असें आहे.

(६) अंशतः अथवा पूर्णपणें शक्तीवर चालणाऱ्या कारखान्यांतील जवळजवळ ८७ टक्के कामगार वर उल्लेखिलेल्या घरगुती धंद्यांत आणि उरलेले अवघे १३ टक्के कामगार छोट्या धंद्यांत आहेत. किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झालें तर या प्रकारच्या कारखान्यांतहि घरगुती स्वरूपाच्याच कारखान्यांचें प्रमाण अधिक आहे. कांहीं कारखान्यांतील कामगार यंत्रमागावर आणि हातमागावरहि काम करतात हें नमूद केलें पाहिजे.

### मागांची संख्या

घरगुती आणि छोट्या कारखान्यांची संख्या ५८,२३८ असून राज्याच्या २७ जिल्ह्यांपैकी १६ जिल्ह्यांत प्रत्येकी १,००० वर कारखाने आहेत. हे जिल्हे पुढीलप्रमाणें आहेतः—बनासकांठा, मेहसाणा, खेडा, सुरत, अहमदनगर, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, नाशिक, दक्षिण सातारा, सोलापूर, उत्तर सातारा, कोल्हापूर, बेळगांव, विजापूर, आणि धारवाड, या जिल्ह्यांत यंत्रमाग वापरणारे छोटे कारखाने मुख्यतः नाशिक, कोल्हापूर, सुरत आणि ठाणें जिल्ह्यांत आहेत. घरगुती स्वरूपाचे कारखाने असलेल्या बहुतेक जिल्ह्यांत सुती विणकाम चालतें तर धारवाड, विजापूर, नाशिक, बेळगांव आणि सुरतमध्यें लोकरीचें आणि रेशमी कापड विणकाम चालतें. ८८ टक्के कारखान्यांत सुती, ९ टक्के कारखान्यांत लोकरी आणि ३ टक्के कारखान्यांत रेशमी कापडाचें विणकाम करण्यांत येतें.

बडोदें, पंचमहाल, कुलाबा आणि डांग या जिल्ह्यांत ५०० हून कमी माग आहेत. नाशिक आणि सुरत जिल्ह्यांत सर्वांत जास्त माग आहेत. एकूण १,२१,९२७ मागांपैकी सुमारें ९३ टक्के हातमाग व सात टक्के यंत्रमाग आहेत.

### सहकारी संघटना

१९५३ मधील पाहणीनुसार सुमारें ५३ टक्के कारखाने सहकारी संघटनेंत सामील झालेले आहेत, घरगुती स्वरूपाच्या कारखान्यांपैकी ५२ टक्के कारखाने सहकारी संघटनांत सामील आहेत तर छोट्या प्रमाणावरील ८२ टक्के कारखाने सहकारी तत्त्वावर चालतात. परंतु हातमाग उद्योगधंद्याला करावयाच्या मदतीबाबतच्या सरकारी कार्यक्रमामुळें आणि जास्तींत जास्त हातमाग सहकारी संघटनांत आणण्याच्या मोहिमेमुळें १९५३ नंतर या परिस्थितींत बराच बदल झाला.

बनासकांठा, अहमदाबाद, पंचमहाल, सुरत, ठाणें, अहमद-नगर, पश्चिम खानदेश, उत्तर सातारा, सोलापूर, दक्षिण सातारा, कोल्हापूर, बेळगांव आणि विजापूर या जिल्ह्यांत या धंद्यांतील ५० टक्के लोक सहकारी संस्थांचे सभासद होते. साबरकांठा, बडोदें आणि कारवार या जिल्ह्यांत मात्र या धंद्याच्या सहकारी संस्था फारशा नाहींत.

---

**वेड्यांची संख्या जास्त वाढली**— फ्रेंच लीग ऑफ मेंटल हायजिन ह्या संस्थेनें वेड्यांसंबंधीं प्रसिद्ध केलेल्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं, जगांतील वेड्यांची संख्या वाढत चालली आहे. प्रत्येक २०० अमेरिकन नागरिकांत एक वेडा आहे, प्रत्येक ३०० फ्रेंच नागरिकांत १ वेडा आहे आणि १,००० इजिप्शिअन नागरिकांत १ वेडा आहे अशी माहिती देण्यांत आली आहे. शहरांतील आवाज व धांवपळ ह्यांचा हा परिणाम आहे, असेंहि मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

## भारतामधील पोलादाचे कारखाने

भारतीय सरकारचे व्यापार व उद्योगमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं होसपेट येथें वृत्तपत्रप्रतिनिधींशीं बोलतांना, देशांतील पोलादाच्या कारखान्यासंबंधीं कांहीं माहिती सांगितली. ते म्हणाले कीं, भारतीय सरकारनें आणखी तीन पोलादाचे कारखाने उभारण्यासाठी परवाने दिले आहेत. बल्लारी जिल्ह्यांत मात्र असा कारखाना स्थापन करणें अतिशय अवघड बाब आहे. कारण, जिल्ह्यांत होसपेटजवळ कोठेंच कोळशाच्या खाणी नाहींत. ह्या बाबतींत भद्रावती येथील लोखंड व पोलादाच्या कारखान्याचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे. भद्रावती येथील कारखान्याला १ टन कोळशाचा पुरवठा करण्यासाठी १०० रुपये खर्च येतो. हा खर्च उत्पादनाच्या खर्चांत खूप वाढ करतो. देशांत लोखंडाच्या मातीच्या खाणी विपुल प्रमाणांत निघूं शकतील. पण त्या मानानें कोळशाचा सांठा मात्र अपुरा आहे. होसपेट येथें पोलादाचा प्रायोगिक कारखाना काढवयाचा झाला तर सरकारला २ कोटी रुपये खर्च करावे लागतील आणि सध्यांची परिस्थिति लक्षांत घेतां सरकारजवळ इतकी रक्कम नाहीं. शिवाय, इतका खर्च करून सुद्धां सुमारें १,००० लोकांनाच कारखान्यांत काम मिळेल. त्यापेक्षा लहान प्रमाणावर चालणारे उद्योग-धंदे काढले तर अधिक लोकांना रोजगार मिळूं शकेल. भारताच्या सिमेंटच्या उत्पादनाबद्दल बोलतांना ते म्हणाले कीं, भारताचें सिमेंटचें वार्षिक उत्पादन सुमारें ६० लाख टन आहे. पण त्यांपैकी ३० टक्के उत्पादन सुद्धां लोकांना मिळण्यासारखें नाहीं. लोकांच्या सिमेंटच्या गरजा भागविण्यासाठी सिमेंटचे अधिक कारखाने काढण्याचा विचार सरकार करीत आहे.

## सिंहांसाठी विंध्यप्रदेशांत नवी वसाहत

भारतांत सौराष्ट्रांतील गीरच्या जंगलांतच फक्त सिंह आढळून येतात हें प्रसिद्धच आहे. सध्यां सिंहाची संख्या सुमारें ३०० असावी. तथापि सिंहासारखा दुर्मिळ असणारा प्राणी एकाच ठिकाणीं केंद्रित झालेला असल्यास तो नाहींसा होण्याची भीति असते. प्रचंड पूर आल्यास अगर दुष्काळ पडल्यास अगर भूकंप झाल्यास सर्वच्या सर्व जातच नष्ट होणें शक्य असतें. म्हणून भारतीय सरकारच्या वन्य पशुविषयक बोर्डानें प्रयोग म्हणून विंध्य-प्रदेशांतील टिकमगडच्या जंगलांत सिंहांची नवीन वसाहत स्थापन करण्याचें ठरविलें आहे. सिंहासंबंधीच्या तज्ज्ञांचें असें मत आहे कीं, शिकाऱ्यांच्या बंदुकीपासून सिंहाचें रक्षण केल्यानें ती जात शिल्लक राहीलच असें नाहीं. त्यासाठी योग्य प्रकारच्या हवामानांत व योग्य ठिकाणीं त्यांची संख्या वाढेल अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे. टिकमगडचें जंगल सिंहांची नवी वसाहत स्थापन करण्यास योग्य आहे असा त्यांचा अभिप्राय आहे. सौराष्ट्र सरकार सिंहांची एक नरमादीची तरूण जोडी पकडून विंध्य प्रदेश सरकारच्या जंगल खात्याला देईल. नव्या घरांत ह्या जोडप्यावर चांगली नजर ठेवण्यांत येणार आहे. भौगोलिक परिस्थिति व हवामान ह्यांचा त्यांच्यावर काय परिणाम होतो, त्यांचें आरोग्य कसें रहातें, वाढ कशी होते, संवयी काय रहातात, इत्यादि बाबींविषयीं लक्ष पुरविण्यांत येईल. म्हणजे, हा नवा प्रदेश सिंहांना मानवतो कीं नाहीं तें समजण्यास मदत होईल. सिंह हा प्राणी मूळचा आशिआ खंडांतील असून नंतर अरबस्थानच्या अंतर्भागांतून आफ्रिका खंडांत ठिकठिकाणीं गेला असें तज्ज्ञांचें मत आहे. शिवाय, तो वाघासारखा एकटा-दुकटा क्वचितच रहातो.

## मध्यप्रदेशांत कृत्रिम तेलाचा कारखाना

भारतीय सरकार कृत्रिम तेल निर्माण करणारा एक कारखाना काढण्याचा विचार करीत आहे, असें समजतें. मध्यप्रदेशांतील बिलासपूर जिल्ह्यांतील ठिकाण कारखान्याच्या जागेसाठी मुक्रर करण्यांत आलें आहे. अशा प्रकारचा कारखाना केवळ मध्य-प्रदेशांतच नव्हे तर भारतांतहि पहिलाच होईल. मध्यप्रदेशांतील ह्या भागांत कोळशाचा विपुल सांठा आहे. त्याचा भरपूर उपयोग करून घेण्यासाठी अशा कारखान्याची चांगली मदत होईल. बिलासपूर जिल्ह्यांतील कोरबा ह्या गांवाच्या आसपास १९४९-५२ पर्यंत भूस्तरविषयक पहाणी करण्यांत आली होती. ह्या पहाणींत असें आढळून आलें कीं, कोरबा गांवाच्या आसमंतांत कित्येक मैलपर्यंत ७ फूट जाडीचा कोळशाचा थर पसरलेला आहे. कोळशाची प्रतहि चांगली आहे. कांहीं ठिकाणीं तर कोळशाचा थर १५४ फूट जाडीचा असल्याचें आढळून आलें असून ह्या थरांत कमी प्रतीच्या व उच्च प्रतीच्या कोळशाचे थर आहेत. भारतीय सरकारनें सिन्थेटिक ऑईल कमिटीकडे ह्या प्रश्नाचा विचार करून शिफारसी करण्याचें काम सोंपविलें होतें. कमिटीच्या शिफारसींना अनुसरून सरकारनें आतां कारखाना उभारण्याचा निर्णय घेतला आहे. कमिटीनें सादर केलेल्या एतद्विषयक अहवालांत अशी शिफारस केली आहे कीं, दरसाल ३,००,००० टन कृत्रिम तेल निर्माण करणारा कारखाना प्रथम उभारण्यांत यावा. कारखान्यासाठी लागणाऱ्या भांडवलासंबंधी अहवालांत असा अंदाज करण्यांत आला आहे कीं, त्यासाठी ५२ ते ५७ लाख रुपयापर्यंत रक्कम जमवावी लागेल.

## भारताच्या वेगवेगळ्या राज्यांतील चहाचा खप
### ( १९५३-५४ )

| राज्य | लोकसंख्या ( जाने. १९५४ ) | एकूण खप ( पौंड ) | दर लक्ष लोक-वस्तीस खपाचें प्रमाण ( पौंड ) |
|---|---|---|---|
| आसाम | १,००,५१,८३९ | १,११,६८,००३ | १,११,१०४ |
| प. बंगाल | २,६२,६४,२२४ | ३,३१,८३,१५३ | १,२६,८८७ |
| बिहार | ४,१४,३२,७२५ | ७८,२५,२९१ | १८,८८७ |
| ओरिसा | १,५०,८५,३२४ | १२,७७,९७३ | ८,४७५ |
| उत्तर प्रदेश | ६,५१,१२,२१५ | ३६,१७,७६९ | ५,६०२ |
| मध्य प्रदेश | २,१८,८४,९५९ | ५१,६२,३२५ | २३,५८८ |
| पंजाब, इ. | १,७७,८१,६८७ | १,८५,३५,९०० | १,०४,३५९ |
| दिल्ली | १७,९६,२९४ | १८,७४,६९३ | १,०४,३५९ |
| राजस्थान | १,६४,६३.६९४ | १५,९१,७६३ | ९,६८० |
| मध्यभारत, इ. | १,२७,३६,२७८ | १७,९६,७४९ | १४,१०७ |
| मुंबई, सौराष्ट्र | ४,१८,८०,९४८ | ४,२८,०७,८३९ | १,०२,२१३ |
| मद्रास, आंध्र | ५,८९,६२,७६९ | ३,२१,७१,८८३ | ५४,५६३ |
| त्रावणकोर-कोचीन | ९५,५८,८३७ | ५२,१५,५९२ | ५४,५६३ |
| म्हैसूर | ९३,४७,२२१ | ३७,१०,७११ | ३९,६९८ |
| हैद्राबाद | १,९२,१४,७६२ | ५७,०५,३१८ | २९,६९२ |
| एकूण | ३६,७५,५३,८७६ | १७,५६,७६,९६२ | ७४,७९६ |

**भारतासाठी रशिआचा कापूस**—मुंबईच्या कापडाच्या गिरण्यांचे प्रतिनिधी व रशिअन प्रतिनिधी ह्यांच्यांत तलम व अजितलम कापडाला लागणारा कापूस रशिआंतून आयात करण्याविषयीं बोलणीं चालू आहेत. कापसाचें नमुनेहि भारतांत पाठविण्यांत आलें आहेत. अशा प्रकारचा ५०,००० ते ७५,००० गांसड्या कापूस रशिआ निर्यात करूं शकेल.

## वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा.

### सन १९५४ च्या वार्षिक सभेपुढील चेअरमन डॉ. मो. ना. आगाशे, एम्. बी. बी. एस्. यांचें भाषण (ता. १९–६–५५)



आपलें वार्षिक इतिवृत्त व ताळेबंद पाहतां या वर्षी आयुर्निधींत ६४ लाखांहून अधिक भर पडली असून तो आतां सहा कोटी शहाण्णव लाख झाला आहे.

अहवाल सालीं आपल्याला जो निव्वळ व्याजाचा दर पडला तो गेल्या मूल्यमापनांत हिशेबीं घेतलेल्या दरापेक्षा बराच जास्त आहे, ही समाधानाची बाब आहे. त्याचप्रमाणें १९५४ मध्यें आपल्या खर्चाचें प्रमाण २५·४८ आहे. हें प्रमाण १९५३ सालच्या सर्व कंपन्यांच्या एकूण खर्चाच्या सरासरी असलेल्या २७·३ या प्रमाणापेक्षा बरेंच कमी आहे.

आपल्या निदर्शनास आणखीहि विशेष प्रामुख्यानें आणण्याची गोष्ट म्हणजे गतवर्षी विमेदार अगर त्यांचे वारस यांच्या कुटुंबांकडे ३२ लाखांहून अधिक रक्कम आपण पोहोंचविली आहे. त्या मानानें मृत्यूनें झालेल्या क्लेमची संख्या मात्र कमी आहे. त्यामुळें कंपनीनें केलेल्या कामाची निवड यथायोग्य होत आहे हें स्पष्ट होईल.

#### कंपनीचें बारावें मूल्यमापन

गतवर्षी अपेक्षिल्याप्रमाणें १९५३ अखेरच्या बाराव्या मूल्यमापनाचा निकाल सर्वतोपरी समाधानकारक आहे. कंपनीस मूल्यमापनाच्या तीन वर्षांच्या काळांत सरासरी पडलेला निव्वळ व्याजाचा दर ४·४१ इतका असूनहि मूल्यमापनांत गृहीत धरण्यांत आलेला दर द. सा. द. शें. ३ टक्के इतकाच आहे व पुढील खर्चासाठी पुरेशी तरतूद करूनहि हयातींतील व हयातीनंतरचे नफ्यासह असणाऱ्या पॉलिसींना मागील मूल्यमापनापेक्षा पुष्कळच जास्त म्हणजे दरसाल दर हजारीं अनुक्रमें रु. १२ व १५ असें बोनस जाहीर करण्यांत आलें आहे, हें नमूद करण्यास मला संतोष वाटतो. सदर मूल्यमापनावरून कंपनीची आर्थिक सुस्थिति, प्रगति व उत्कर्ष अबाधित राखलीं गेलीं आहेत हें दिसून येईलच. इतकेंच नव्हें, तर आपल्या कंपनीची एक नमुनेदार व सर्वांगीण संस्था अशी ख्याती आज भारतवर्षांत होऊन तिची गणना प्रमुख विमा कंपन्यांत प्राधान्यानें केली जाते, या गोष्टीचा अभिमानानें उल्लेख करण्यास मला अत्यानंद होत आहे.

#### इन्व्हेस्टमेंट्स्

१९५३ च्या मानानें पाहतां अहवाल सालीं म्हणजे १९५४ अखेर रोखे, शेअर्स वगैरेंच्या बाजारभावांत कांहीं सुधारणा आहे व त्यामुळें १९५३ अखेर इन्व्हेस्टमेंटस्च्या बाजारभावांत जी सुमारें रु. १५,३८,००० घट दिसत होती ती १९५४ अखेर कमी होऊन ती आतां सुमारें रु. १२,८०,००० एवढीच दिसत आहे. याप्रमाणें घट जरी कमी झाली तरी इन्व्हेस्टमेंट रिझर्व फंडांतून कांहींहि रक्कम काढून घेण्यांत आली नाहीं व तो फंड गतवर्षीइतकाच म्हणजे रु. १६,००,००० ठेवण्यांत आला आहे. व तो सालअखेर दिसत असलेल्या घटीपेक्षा सुमारें ३ लाखांहून जास्त आहे.


## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

## सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लक्ष रु. |
| रिझर्वस् व इतर फंडस् | ५¾ लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | सव्वा कोटीवर |

— व्याजाचे दर —

| | | | द. सा. द. शें. |
|---|---|---|---|
| करंट | ... | ... | रु. ०–८–० |
| सेव्हिंग | ... | ... | रु. १–८–० |
| स्पे. सेव्हिंग | | ... | रु. २–०–० |
| १ वर्ष मुदत | | ... | रु. ३–०–० |
| २ वर्षे मुदत | | ... | रु. ३–४–० |
| ३ वर्षे मुदत | | ... | रु. ३–८–० |
| ४ वर्षे मुदत | | ... | रु. ३-१२-० |
| ५ वर्षे मुदत | | ... | रु. ४–०–० |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

### व्याजाचा पडलेला दर

१९५४ सालीं पडलेला निव्वळ व्याजाचा दर ३·७२ आहे. व तो १९५३ सालच्या ४·४३ या दरापेक्षा कमी आहे. मात्र १९५४ चा ग्रोस व्याजाचा दर ४·६९ असून तो १९५३ च्या ४·५० या दरापेक्षा जास्त आहे. ही सकृद्दर्शनी विसंगत परिस्थिति इन्कमटॅक्स रिफंड अनियमितपणें आल्यामुळें निर्माण झालेली आहे. अहवालसालीं आपल्याला इन्कमटॅक्स रिफंड फक्त रु. ५६,०४१ मिळाला, तर १९५३ सालीं गतवर्षीच्या माझ्या भाषणांत मीं म्हटल्याप्रमाणें एकदम दोन वर्षांचा रिफंड त्यावेळीं मिळाला व तो रु. ५,६५,१८५ एवढा मोठा होता. यंदाचे वर्षांत एक वर्षाचा जरी रिफंड आला असतां तरीहि निव्वळ व्याजाचा दर अंदाजीं शेंकडा सव्वाचार पडला असता. सरकारकडून इन्कमटॅक्सचा रिफंड ठराविक वेळीं येत नाहीं. अर्थात् ही परिस्थिति केवळ आपल्यापुरतीच आहे असें नसून इतरहि विमाकंपन्यांचा अनुभव कमीअधिक प्रमाणांत असाच आहे. सरकारकडून इन्कमटॅक्सचा रिफंड जर अधिक नियमितपणें आला तर निव्वळ व्याजाचे दरांत असे चढउतार सहसा दिसून येणार नाहींत. परंतु रिफंड निश्चित केव्हां येईल हें ठरविणें आपल्या हातचें नाहीं. तेव्हां आहे या परिस्थितींत कंपनीनें गुंतविलेल्या पैशावर व्याज कसें काय सुटलें हें पाहावयाचें झाल्यास, निव्वळ व्याजापेक्षा ग्रोस व्याजाकडे लक्ष देणें अधिक योग्य होईल असें वाटतें व त्या दृष्टीनें पाहिल्यास आपल्याला पडणारें ग्रोस व्याज समाधानकारक आहे असें दिसून येईल.

माझ्या मागील सालच्या भाषणांत, आपली पुण्याची भव्य इमारत व भारताचे उपाध्यक्ष श्री. राधाकृष्णन् यांच्या हस्तें तिचें उद्घाटन या गोष्टींचा उल्लेख मीं केला होताच. पुणें येथील या नव्या इमारतींशिवाय कोल्हापूर व दिल्ली येथेंहि आपल्या मालकीच्या नवीन इमारती झाल्या आहेत. दिल्ली येथें आपल्या जुन्या इमारतीशेजारील नवीन इमारत आपण विकत घेतल्यानें भारताच्या राजधानींत आपली एक भव्य अशी इमारत झाली आहे. क्रमाक्रमानें इतर ठिकाणींहि आपल्या इमारती होतील असा मला आत्मविश्वास वाटतो.

### दि स्टेट बँक ऑफ इंडिया

दि स्टेट बँक ऑफ इंडिया १ जुलै रोजीं सुरू झाली. त्या दिवशीं इंपीरिअल बँकेच्या पाटीचे जागीं स्टेट बँकेची पाटी झळकूं लागली. सेंट्रल बोर्डाची मुंबई येथें पहिल्या दिवशीं सभा झाली. येत्या पांच वर्षांत स्टेट बँकेनें ४०० नव्या शाखा उघडावयाच्या आहेत. बँकेची मुख्य कचेरी मुंबई येथें रहाणार आहे. इंपीरिअल बँकेचे पूर्वीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. एस. के. हंडू ह्यांना स्टेट बँकेचे १ जुलै, १९५५ पासून ३० सप्टेंबर, १९५८ अखेर मुदतीसाठी दोघांपैकीं एक मॅनेजिंग डायरेक्टर नेमण्यांत आलें आहे

### स्टडी सर्कलचें उद्घाटन

मंगळवार दि. ५ जुलै रोजीं, डेक्कन बँक्स असोसिएशननें सुरू केलेल्या स्टडी सर्कलचें उद्घाटन प्रा. स. वा. कोगेकर, बी. ए., बी. एससी. ( लंडन ) ह्यांच्या हस्तें झालें.

### बँका आणि त्यांचे प्रकार

बुधवार, दि. ६ जुलै रोजीं रात्रीं ८-१५ वाजतां पुणें रेडिओ केंद्रावरून, "भारतीय बँका—बँका आणि त्यांचे प्रकार" ह्या विषयावर श्री. श्री. बा. काळे, संपादक "अर्थ", ह्यांचें भाषण होणार आहे.

### प्राप्तीकराचा आगाऊ भरणा

#### सरकारकडून स्मरणार्थ सूचना

ज्या व्यक्तींच्या उत्पन्नांवर अजूनपर्यंत प्राप्तीकराची आकारणी करण्यांत आलेली नाहीं त्यांचें लक्ष १९२२ च्या प्राप्तीकर कायद्याच्या १८ ए ( ३ ) कलमांतील तरतुदींकडे वेधण्यांत येत आहे. अशा प्रत्येक व्यक्तीनें ती जेथें व्यापार वा व्यवसाय करीत असेल त्या विभागाच्या प्राप्तीकरअधिकाऱ्याकडे अगर इतर प्रकरणीं ती राहते त्या ठिकाणच्या विभागाच्या प्राप्तीकरअधिकाऱ्याकडे १९५५–५६ च्या आकारणीकरतां आपलें उत्पन्न, कंपनीच्या बाबतींत २५०० रुपये, व्यक्ति वा फर्म अगर व्यक्तींनीं उभारलेली संस्था यांच्या बाबतींत ६७०० रु. आणि ज्यांना विभक्त होऊन हिस्सा मागतां येतो अशा किमान दोन अगर चार व्यक्तींच्या अविभक्त हिंदु कुटुंबाच्या बाबतींत १०,९०० रुपये अगर १५,१०० रुपये यापेक्षा अधिक असण्याचा संभव असल्यास, अशा व्यक्तीनें, पगार, रोख्यांवरील व्याज व लाभ (डिव्हिडण्ट) या व्यतिरिक्त मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यास आगाऊ भराव्या लागणाऱ्या कराचें अंदाजपत्रक त्या उपकलमान्वयें प्रत्येक आर्थिक वर्षी १५ मार्च पूर्वी सादर केलें पाहिजे.

#### कराची आकारणी व भरणा

अशा रीतीनें आगाऊ भरावयाच्या प्राप्तीकराचा अगर सुपरटॅक्सचा हिशोब, ज्या वर्षी हे कर भरावयाचे त्या आर्थिक वर्षी अंमलांत असलेल्या दरानें करून १५ जून, १५ सप्टेंबर, १५ डिसेंबर आणि १५ मार्च या दिवशीं अगर अंदाजतक्ता सादर करावयाच्या वेळेपर्यंत मुदत संपणार नाहीं अशा अन्य दिवशीं तिमाही हप्त्यानें भरणा करावयाचा असतो.

#### सरकारकडून मिळणारें व्याज

उत्पन्नावरील नियमित करआकारणीच्या रकमेपेक्षा या कायद्याच्या १८ ए कलमान्वयें आगाऊ भरलेल्या कराच्या जास्त रकमेवर, तो भरणा करण्याच्या दिनांकापासून तों अशी नियमित करआकारणी होण्याच्या दिनांकापर्यंतच्या मुदतीचें सरकारनें २ एप्रिल १९५५ पूर्वी अशा करपात्र व्यक्तीस २ टक्के दरानें व्याज दिलें आहे. १ एप्रिल १९५५ नंतर भरलेल्या आगाऊ कराच्या अशा अधिक रकमेवर, हा व्याजाचा दर वाढवून आतां ४ टक्के करण्यांत आला आहे. याउलट, अशा अंदाजाचा तक्ता सादर न केल्यास, वा तो मुद्दाम चुकीचा सादर केल्यास, अशा प्रकरणीं योग्य त्या शिक्षेच्या जोडीस दरसाल दर शेंकडा ४ टक्के दरानें व्याज भरावें लागेल.

### पारनेर सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा समारोप

नगर जिल्हा सहकारी बोर्डाचे विद्यमानें पारनेर येथें ता. १० मे पासून ता. २५ जून अखेरपर्यंत सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग चालविला. ता. २६ व २७ जून रोजीं सदर वर्गाची परीक्षा घेतली. वर्गात एकूण ३८ विद्यार्थी दाखल झाले होते. पण फक्त २४ विद्यार्थीच परीक्षेस बसूं शकेल. ह्या शिक्षणवर्गाचा समारोप ता. २७ रोजीं दुपारीं आमदार भास्करराव औटी, एम्. एल. ए. यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला. आरंभीं को. ट्रे. इन्स्पेक्टर श्री. देशमुख ह्यांनीं शिक्षणवर्गासंबंधीं प्रास्ताविक माहिती सांगितली. नंतर बोर्डाचे अध्यक्ष श्री. काळे व आमदार औटी यांनीं सहकारी चळवळीची उपयुक्तता व सोसायट्यांच्या अडचणी ह्यासंबंधीं मार्मिक विवेचन करून उपस्थित सेक्रेटरींना त्यांच्या जबाबदारीची जाणीव दिली. शेवटीं आभारप्रदर्शन व पानसुपारी होऊन हा छोटासा समारंभ संपला.

## G. D. C. A. Examination Result

The undermentioned candidates have been declared by the Co-operation and Accountancy Diploma Board to have passed the Government Diploma in Co-operation and Accountancy Examination held in April 1955 at Poona.

**I Class**

Acharya S. N., Chinmulgund V. M.

**II Class**

Mirza M. N., Muley R. S., Patil B. K.

**Pass Class**

Gawade B. V., Goyal Suraj Bhan, Hattikudur M. J., Havanur H. M., Karkhanis P. T., Kulkarni M. K., Mehta G. K., Mehta P. G., Misal B. S., Osa A. K., Patel B. J., Patil S. B., Parikh B. C., Pawar B. G., Raibagi A. H., Sanu V. H., Savant G. Y., Shringarpure K. R., Shah S. G., Shah A. K., Siddheshwar G. K., Tandale N. T., Trivedi I. H., Aursang S. R., Belsare N. N., Degavkar P. S., Desai R. P., Galgali S. K., Gokhale H. V., Inamdar V. L., Jawadekar S. M., Joshi J. M., Mathad G. S., Nandi S. N., Naik D. D., Nivargi, C. B., Parikh P. M., Parikh S. J., Patel N. B., Patil, G. B., Reejsinghani H. N., Shah G. D.

**Passed in 'Co-oparation' Group only**

Desai, B. A., Desai G. M., Doshi S. D., Fadia B. P., Iyengar Krishna T., Joshi H. K., Joshi M. P., Mamdapur M. B., Patil D. V., Saiyad M. S., Solanki R. D., Thakkar, M. C.

**Passed in 'Accountancy' Group only**

Gupta Baij Nath, Agnihotri N. T., Aiyar Narayanswamy, Alur B. V., Bhalode V. V. Dhopawkar N. R., Gogate V. H., Gondkar P. A., Hosamath G. M., Joshi R. V., Kalaskar D. R., Namdas H. L., Namjoshi K. A., Patel A. M., Patel K. L., Patel M. S., Patankar B. A., Rajsinghani J. R., Rokade R. S., Thaker C. N., Udawant Pandit I., Vaidy M. B.

No. 95—Not eligible for Government Diploma in Co-operation and Accountancy.

### इंदापूर सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा समारोप

पुणें जिल्हा सहकारी बोर्डाच्या विद्यमानें इंदापूर येथें चालू असलेल्या सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गाचा समारोप समारंभ दिनांक २९।६।५५ रोजीं बुधवारीं सायंकाळीं ५ वाजतां इंदापूर येथील मा. सहकारी कार्यकर्ते के. डी. व्यवहारे यांचे हस्तें झाला. प्रथम श्री. प्रतापराव सूर्यवंशी यांनीं अध्यक्षांची ओळख करून दिली व विद्यार्थ्यांनीं या वर्गाचा पुढील आयुष्यांत कसा उपयोग करून घ्यावा व त्याची देशाच्या सार्वजनिक जीवनांत कशी मदत होईल हें सांगितलें नंतर श्री. केळकर, हेडमास्तर आयडियल इंग्लिश स्कूल इंदापूर यांनींहि वरील प्रमाणेंच सांगितलें. त्यानंतर २–३ विद्यार्थ्यांनीं वर्गांतील शिक्षणाचा उपयोग आपण कसा करणार आहोंत तें सांगितलें. श्री. आर. डी. अभ्यंकर, को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर पुणें यांनीं सहकारी जीवनाशीं सेक्रेटरीचा असलेला संबंध सांगून देशाच्या सेवेसाठी कोणतें काम करतां येईल याबद्दलची माहिती सांगितली. समारोपादाखल भाषण करतांना श्री. के. डी. व्यवहारे यांनीं सर्वांना आतां देशाच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अधिक जोरानें सहकारी चळवळ वाढीस लावण्याची जबाबदारी सेक्रेटरीसारख्या मुख्य घटकांवर अवलंबून असल्यामुळें त्यानें हेंच देशसेवेचें व्रत घेतलें पाहिजे व देशसमृद्धीस मदत केली पाहिजे असें सांगितलें.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ टिळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,४६,००० |
| ठेवी | रु. १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.